पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०३/०२/२०२१**

## गडचिरोली पोलीस दलाच्या व बी.ओ. आय. आरसेटी यांच्या पुढाकाराने ९५ बेरोजगार युवक-युवतींना मिळाले व्यवसायीक प्रशिक्षण

- **मा. पोलीस अधीक्षक सा़ो. यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप**
- **गडचिरोली पोलीस दल व बि.ओ.आय. आरसेटी यांचा अभिनव उपक्रम**

गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशिल व आदिवासी बहुल असून येथील आदिवासी युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व ते आत्मनिर्भर व्हावेत या उद्देशाने गडचिरोली पोलीस दलाने “रोजगार मेळावा” हे ॲप तयार केले असून या ॲप मध्ये पाच हजार बेरोजगार युवक-युवतींनी आपली नाव नोंदणी केली आहे. या ॲपचे माध्यमातुन आतापर्यंत १०६० बेरोजगार युवक-युवतींना रोजगार प्राप्त झाला असुन, इच्छुक बेरोजगार युवक-युवतींकरीता कौशल्यावर आधारीत विविध प्रशिक्षण सुध्दा राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणुन मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्यावतीने सदर ॲप मधुन बी.ओ.आय. स्टार आरसेटी गडचिरोली यांचे मार्फतीने ९५ युवक-युवतींना ब्युटीपार्लर, कुक्कुटपालन व मत्स्यपालनचे व्यावसायिक प्रशिक्षण देवुन स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने ब्युटीपार्लर प्रशिक्षणामध्ये ३५, मत्स्यपालन प्रशिक्षणामध्ये २५ व कुक्कुटपालन प्रशिक्षणामध्ये ३५ अशा एकुण ९५ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला होता. हे एक महीण्याचे प्रशिक्षण दिनांक ०५ जानेवारी २०२१ रोजी सुरु होवुन आज दिनांक ०३ फेब्रवारी २०२१ रोजी पुर्ण झाले असल्यामुळे गडचिरोली पोलीस दलाचे वतीने सदर प्रशिक्षणार्थीना निरोप देण्यात आला. सदर कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असुन, मा. पोलीस अधीक्षक सा़ो. यांनी प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र देवुन त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, यशस्वी उद्योजक होण्यासाठी प्रशिक्षण महत्वाचे असून, प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगार युवक-युवतींनी स्वत:च्या व्यवसाय उभारणीसाठी प्रयत्न करावे व यशस्वी व्हावे. प्रगत असलेल्या महाराष्ट्रात गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त जिल्हयाला विकासाच्या दिशेने घेवुन जाण्यासाठी गडचिरोली पोलीस दल नेहमीच पाठीशी आहे असे सांगितले.

यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. समीर शेख सा़ो.,आरसेटीचे व्यवस्थापक मा. श्री युवराज टेंभुर्णे, संचालक मा. श्री. चेतन वैद्य, प्रशिक्षण समन्वयक (ब्युटीपार्लर) श्री. पुंडलिक काटकर, प्रशिक्षण समन्वयक (कुक्कुटपालन) श्री. हेमंत काटकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आरसेटी बँक ऑफ इंडिया तसेच नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि महादेव शेलार व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.


BOI-STAR RSETI,GADCHIROLI

BOI
RSETI
बी. ओ. आय. स्टार आरसेटी गडचिरोली

BOI
RSETI
बी. ओ. आय. स्टार आरसेटी गडचिरोली